**मुद्रांक शुल्क, नोंदणी फी इ.बाबीद्वारे शासनाकडे जमा होणारी महसूलाची रक्कम GRAS या प्रणालीद्वारे स्विकारणे व बँकेद्वारे संबंधितांना e-SBTR (e-secured bank cum treasury receipt) देणे..**

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:मुद्रांक-२०१२/३०/प्र.क्र.१८(पुबा)(१९८/११)/म-१,
मादाम कामा रोड,हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई – ४०० ०३२
दिनांक : १५ मार्च, २०१३

**पार्श्वभूमी :-**

मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, दस्त नोंदणी करण्यासाठी सेवाशुल्क या विविध बाबींद्वारे शासनाकडे जमा होणारी महसूलाची रक्कम GRAS या प्रणालीद्वारे प्राधिकृत बँकाद्वारे स्विकारणे, रक्कम स्विकारल्यानंतर संबंधितांना e-SBTR देण्यात येणे. e-SBTR रिसिट करिता मनौती (Discount) आकारणे व e-SBTR चा स्टेशनरी खर्च भारत प्रतिभूती मुद्रणालयास अदा करणे या बाबीच्या अनुषंगाने नोंदणी महानिरीक्षक यांनी सादर केलेला प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यानुसार या प्रकरणी मंत्रीमंडळाच्या मान्यतेने खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, दस्त नोंदणी करण्यासाठी सेवाशुल्क या विविध बाबींद्वारे शासनाकडे जमा होणारी महसूलाची रक्कम GRAS या प्रणालीद्वारे प्राधिकृत बँकाद्वारे स्विकारणे, बँकेद्वारे रक्कम स्विकारल्यानंतर संबंधितांना e-SBTR रिसिट देण्यात येणे, e-SBTR रिसिट करिता सेवाशुल्क आकारणे व e-SBTR चा स्टेशनरी खर्च भारत प्रतिभूती मुद्रणालयास अदा करणे या बाबीकरिता पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१) e-SBTR स्टेशनरीकरिता होणारा खर्च भारत प्रतिभूती मुद्रणालयास प्रचलित मुद्रांक अदायगी प्रमाणे रक्कम अदा करणे. याप्रमाणे छपाई पोटी व मनौतीपोटी दयावयाचा खर्च मुख्य लेखाशिर्ष २०३० खालील अनुदानातून भागविण्यात यावा.

२) e-SBTR साठी प्राधिकृत बँकेस रु.१५०/- याप्रमाणे बँकेस मनौती (discount) अदा करण्यात यावी व मनौतीकरिता प्राधिकृत बँकेने नोंदणी महानिरीक्षक/अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई यांचेकडे देयके सादर करावीत.

३) e-SBTR छपाईचा खर्च व बँकेची मनौती (discount) शासनाने अदा करावे.

४) e-SBTR चलनाचे मूल्य शासन वेळोवळी निश्चित करेल त्याप्रमाणे असेल. सुरुवातीला e-SBTR चलनाचे किमान मूल्य रु.५०००/- राहील.

(कृ.मा.प.)

५) रु.५०,०००/- पर्यन्तच्या e-SBTR वर बँकेच्या एका प्राधिकृत अधिका-यांची स्वाक्षरी तर रु.५०,०००/- वरील e-SBTR बँकेच्या दोन प्राधिकृत अधिका-यांच्या स्वाक्षरी असणे आवश्यक राहील. सदरची बाब करारनानाम्यात समाविष्ट करावी.

६) e-SBTR च्या अदात्याची (payer) ची वैयक्तिक माहिती आभासी कोषागाराकडे (virtual treasury) जमा करेल.

७) शासनाच्यावतीने अदाकर्त्यांकडून सहभागी बँका महसूल जमा करतात. अशा महसूलाची रक्कम बँकेत जमा केल्यावरच ती शासनखाती जमा झाल्याचे ग्राह्य धरले जाते. याबाबतची तरतूद महाराष्ट्र कोषागार नियम १९६८ मधील नियम ४१३ मध्ये विषद केलेली आहे. e-SBTR च्या संदर्भातील रक्कम रिझर्व्ह बँकेकडे भरणा होण्यापूर्वी अदाकर्त्यास e-SBTR त्वरित वितरीत करण्यात यावा. म्हणजेच e-SBTR द्वारे बँकेकडून शासनास प्राप्त होणारी रक्कम संबंधित उपभोक्त्यांच्या बँक खात्यातून ग्रास प्राधिकृत बँकेकडे रक्कम वर्ग झाल्यानंतर लगेच देणे आवश्यक राहील.

८) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी या प्रकरणी बँकेशी करावयाच्या करारनाम्यामध्ये सुरक्षेच्या मुद्यांसह सर्व मुद्यांचा समावेश करुन सदर करारनाम्याचा मसुदा आणि या प्रकरणी अवलंबावयाची कार्यपध्दती संचालक, लेखा व कोषागरे यांच्याशी विचार विनिमय करुन निश्चित करावी .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नांवाने.

(ज्योत्स्ना मु. माडेकर)
कक्ष अधिकारी

प्रत,

मुख्य सचिव यांचे कार्यालय, मंत्रालयमुंबई ,
प्रधान सचिव, विधी वन्याय विभाग, मंत्रालय, मुंबई,
प्रधान सचिव ,वित्त विभागमुंबई ,मंत्रालय ,
सचिव, (लेखा व कोषागारे), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई,
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई,
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व उपनोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक,
सर्व सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा कोषागारअधिकारी,
उपसचिव ,महसूल व वन विभाग) का.म-१/मुद्रांक(, मंत्रालय ,मुंबई
निवडनस्ती (म-१), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.